# शेतकरी, शेतमजूर पंचायत (महाराष्ट्र)

## घटना

**नांव** – या संघटनेचे नांव **शेतकरी, शेतमजूर पंचायत ( महाराष्ट्र )** असे राहील. पंचायतीची मुख्य कचेरी पुणे येथे राहील.

**उद्देश**– १) महाराष्ट्रातील छोटे, गरीब शेतकरी व शेतमजूर यांच्यावरील अन्यायाची दाद लावून घेणे.

२) भूमिहीन लोकांना सरकारी पडीक जमीन, जंगल जमीन मिळवून देणे.

३) कमाल जमीनधारणेच्या कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी असा आग्रह धरून वाढीव जमीन वाटण्याचा प्रयत्न करणे.

४) छोट्या व जिराईत शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी अवजारे व साधने मिळवून देणे.

५) शेतकरी वर्गात सामाजिक समतेचा पुरस्कार करणे.

६) शेतमजुरांना योग्य वेतन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

छोटे शेतकरी व शेतमजूर आणि भूमिहीन लोकांचे राहणीमान वाढावे, त्यांना राहण्यास घरे मिळावी म्हणून खटपट करणे.

८) दलित व आदिवासी शेतकऱ्यांवर, शेतमजूरांवर होणाऱ्या सामाजिक अन्यायाविरुद्ध लढणे व त्यांना सवलती मिळवून देणे.

९) महाराष्ट्रातील शेतीधंद्याची अशा रीतीने पुनर्रचना व्हावी म्हणून प्रयत्न करणे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील विकासाचा फायदा उपेक्षित व दुर्बळ घटकांना प्रथम मिळेल.

१०) सरकारी पंचवार्षिक योजनांमध्ये ग्रामीण भागाला व त्यातही विशेषतः दुष्काळी ग्रामीण भागाची सुधारणा व विकास करण्याचे कामाला अग्रक्रम मिळावा म्हणून प्रयत्न करणे.

**सभासद**– महाराष्ट्रातील कोणाही शेतकऱ्याला (ज्याच्या सर्व जमिनीपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न ३००० रुपयापेक्षा जास्त नाही.), शेतमजूराला किंवा भूमिहीनाला तसेच जंगले, पोल्ट्री व डेअरीसारख्या शेतीच्या जोडधंद्यांत काम करणाऱ्या कामगाराला त्याच्या वयाला १८ वर्षे पूर्ण झाली असल्यास व त्याने पंचायतीची घटना व उद्देश मान्य केल्यास पंचायतीचे सभासद होता येईल.

**वर्गणी** -- सभासदाची वर्गणी वार्षिक तीन रुपये राहील. जरूर तेव्हा ऐच्छिक देणगी गोळा करण्यात येईल.

**सामान्य सभासद** – जे स्वतः शेतकरी किंवा शेतमजूर नाहीत पण पंचायतीचे उद्दिष्टासाठी पंचायतीच्या सभासदांना मार्गदर्शन करण्यास तयार आहेत अशा काही व्यक्तींना पंचायतीचे सन्मान्य सभासद करून घेण्यात येतील. मात्र त्यांची संख्या प्रत्येक जिल्ह्यात १० पेक्षा अधिक असणार नाही. अशा सदस्यांना जिल्हा समितीच्या वार्षिक सभेत स्वीकृत करून घेण्यात येईल.

## संघटन :

**( अ ) प्राथमिक समिती**—ज्या गावात किंवा गावांच्या गटात पंचायतीचे किमान २५ सभासद नोंदविले असतील तेथे प्राथमिक समिती बनविण्यात येईल. प्राथमिक समितीचे दैनंदिन काम चालविण्यासाठी एक चिटणीस व जास्तीत जास्त सात सभासद असे कार्यकारी मंडळ निवडण्यात येईल. या कार्यकारी मंडळाने पंचायतीचे सभासद नोंदविणे व पंचायतीचे उद्देश पार पाडण्यासाठी आपल्या सभासदांना जरूर ते सहाय्य करणे ही कामे करावयाची आहेत.

**(आ) तालुका समिती**— ज्या तालुक्यांत किमान पाच प्राथमिक समित्या संघटित झाल्या असतील त्या समित्यांचे चिटणीस व कार्यकारी मंडळाचे सभासद मिळून तालुका समिती बनेल. या समितीने दरवर्षी वार्षिक बैठकीत आपल्या सभासदांमधून एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक चिटणीस, एक खजिनदार व जास्तीत जास्त पंधरा सभासद असे कार्यकारी मंडळी निवडावयाचे आहे.

प्राथमिक समितीच्या कामात मार्गदर्शन करणे, सुसूत्रता आणणे व तालुका पातळीवरील प्रश्न हाताळणे, शेतकरी व शेतमजुरांची गाऱ्हाणी तालुका अधिकाऱ्याकडे नेणे किंवा पंचायतीचे वरिष्ठ समितीकडे पाठविणे ही तालुका समितीची कामे राहतील.

प्रत्येक गाव किंवा प्राथमिक समितीने आपल्या सभासदांची एक यादी तालुका समितीकडे व एक यादी जिल्हा समितीकडे पाठवावयाची आहे.

**( इ ) जिल्हा समिती**—ज्या जिल्ह्यात किमान तीन तालुका समित्या संघटित झाल्या असतील त्या जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या कार्यकारिणीचे सदस्य मिळून जिल्हा समिती बनेल. या समितीने वार्षिक बैठकीत आपल्या सभासदामधून एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष एक चिटणीस, दोन सह-

चिटणीस, एक खजिनदार व जास्तीत जास्त वीस सदस्य असे जिल्हा कार्यकारी मंडळ निवडावयाचे आहे.

जिल्हा कार्यकारी मंडळाने तालुका समित्यांच्या कामात मार्गदर्शन करणे, एकसूत्रता आणणे व आपल्या सदस्यांचे प्रश्न जिल्हा पातळीवरील अधिकारी वर्गाकडे नेणे, जिल्हा पातळीवरील प्रश्न हाताळणे, जिल्हा शेतकरी शेतमजूर पंचायतीचे काम सुसंघटित करणे, त्यासाठी प्रचार सभा, शिबीरे घेणे वगैरे कामे करावयाची आहेत.

**राज्य समिती**—महाराष्ट्रातील किमान पाच जिल्ह्यांत जिल्हा समित्या संघटित झाल्यास या सर्व जिल्हा कार्यकारी मंडळांचे सदस्य मिळून शेतकरी शेतमजूर पंचायतीची राज्यसमिती बनेल. ही समिती दरवर्षी एक राज्यपरिषद संघटित करील. जिल्हा समित्यांचे सर्व सभासद हे या परिषदेस प्रतिनिधी राहातील. ही परिषद शेतकरी, शेतमजूर पंचायतीची सर्वोच्च संस्था राहील व पंचायतीचे सर्व धोरणविषयक निर्णय घेण्याचा अधिकार या परिषदेस राहील.

**राज्य कार्यकारी मंडळ**—परिषदेतील प्रतिनिधी एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, एक सरचिटणीस, तीन सहचिटणीस, एक खजिनदार व जास्तीत जास्त तीस सदस्य असे राज्य कार्यकारी मंडळ निवडतील. राज्य कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष व सरचिटणीस हेच राज्यसमितीचे अध्यक्ष व सरचिटणीस राहातील. दोन परिषदांचे दरम्यान राज्यसमिती ही सर्वोच्च संस्था मानली जाईल. व परिषदेने घेतलेल्या निर्णयांची कार्यकारी मंडळाकडून अंमलबजावणी करून घेणे हे राज्यसमितीचे काम राहील.

## पदाधिकाऱ्यांची कामे

( १ ) सर्व समित्यांचे अध्यक्ष आपापल्या समित्यांच्या बैठकांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील व त्या त्या समित्यांचे किंवा कार्यकारी मंडळाचे कामावर देखरेख करतील.

( २ ) सर्व समित्यांचे चिटणीस किंवा सरचिटणीस यांनी आपापल्या समित्यांच्या किंवा कार्यकारी मंडळाच्या बैठका बोलावणे, त्यांचे इतिवृत्त लिहिणे, कचेरी चालविणे, वगैरे कामे करावयाची आहेत. त्यांनी आपल्या कामाचा वार्षिक अहवाल आपल्या वार्षिक बैठकीत सादर करावयाचा आहे.

प्राथमिक व तालुका समितीच्या चिटणिसांनी आपापला जमाखर्च व हिशेब ठेवायचा आहे व त्यांनी तो आपापल्या समितीच्या वार्षिक बैठकीत सादर करावयाचा आहे.

( ३ ) जिल्हा कार्यकारी मंडळ व राज्य कार्यकारी मंडळ यांचे खजिनदारांनी आपापल्या कक्षेतील हिशेब व जमाखर्च ठेवावयाचा आहे व तो अनुक्रमे जिल्हा समितीच्या बैठकीत व राज्यसमितीच्या वार्षिक परिषदेत सादर करावयाचा आहे.

( ४ ) **सभासद व वर्गणीची वाटणी** पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

प्रत्येक सभासदाकडून वर्षाकाठी जमा केलेल्या तीन रुपये वर्गणीपैकी १ रुपया तालुका कमिटीकडे, १ रुपया जिल्हा समितीकडे, व १ रुपया राज्यसमितीकडे असे वाटप करण्यात येतील. याखेरीज आपापल्या पातळीवर ठराव करून विशेष निधी जमवण्याचा अधिकार सर्व समित्यांना राहील. मात्र या ठरावाला वरिष्ठ समितीची परवानगी घेतली पाहिजे व अशा निधीचे सर्व हिशेब वरिष्ठ समितीस सादर केले पाहिजेत. राज्यसमिती, जिल्हा समिती व तालुका समितीने आपला निधी अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार यांच्या सह्यानिशी बँकेत ठेवावा.

## कोरम व पूर्व सूचना

सर्व कार्यकारी मंडळे व समित्या यांच्या बैठकांना एकूण सभासदांच्या एक-तृतियांश सभासदांइतका कोरम राहील. प्रत्येक सभेस किमान सात दिवसांच्या पूर्वसूचनेची व खास सभेला तीन दिवसांच्या पूर्वसूचनेची गरज आहे.

## घटनेत बदल

राज्यसमितीच्या वार्षिक परिषदेत दोन तृतियांश बहुमताने घटनेत बदल करता येईल. मात्र अशा ठरावासाठी किमान १५ दिवसांची पूर्व-सूचना दिली पाहिजे.

## नियम

घटनेत नमूद केलेली उद्दिष्टे व घटनेतील कलमे यांना धरून पंचायतीच्या निरानिराळ्या घटकाचे काम कसे चालावे यासंबंधी जरूर ते नियम करण्याचा अधिकार राज्य कार्यकारी मंडळास आहे. त्याचप्रमाणे राज्य कार्यकारी मंडळास जिल्हा व तालुका पातळीवरील विविध घटकांनी केलेल्या कामावर देखरेख करण्याचा, त्यांचे कामाचे नियंत्रण करण्याचा अधिकार राहील.

प्रकाशक : **बा. न राजहंस**, शेतकरी शेतमजूर पंचायत, (महाराष्ट्र) पुणे.
मुद्रक : **श्री. पु. लिमये**, जनवाणी प्रिंटिंग प्रेस, ४५ बुधवार, पुणे २.